सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक १५

# मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२०

(दिनांक ३१ ऑगस्ट, १९८५ पर्यंत सुधारित)

**Bombay Act No. XV of 1920**

# The City of Bombay Primary Education Act, 1920

*(As modified upto 31st August 1985)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांनी मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रकाशित केले.

**2006**

**[किंमत : रु. ३-००]**

# मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२०

[सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक १५]

## अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व अन्वयार्थ लावणे

२. व्याख्या

३. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासाठी अधिसूचना काढणे.

४. महागरपालिकेने प्राथमिक शिक्षणाबाबत तरतूद करणे.

५. अधिसूचना काढण्यापूर्वी ठराव पारित करणे.

६. शिक्षण समितीचे कर्तव्य.

७. मुलांनी शाळेत जावे म्हणून व्यवस्था करणे हे आईवडिलांचे कर्तव्य असेल.

८. वाजवी सबब वा संज्ञेचा अर्थ.

९. शाळेत जाण्याचा आदेश देणे.

१०. मुलास शाळेत जाण्यास लावण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

११. सक्तीच्या शिक्षणास पात्र असलेल्या मुलास नोकरीला लावण्याबद्दल शास्ती.

१२. शिक्षण समितीस तिच्यावतीने हजर राहण्याचा प्राधिकार एखाद्या व्यक्तीस देता येणे.

१३. [निरसित केले].

१४. फी माफ करणे.

१५. विशिष्ट वर्गांना किंवा समाजांना सूट देण्याचा अधिकार

१६. कसुरीबद्दल अधिसूचना मागे घेणे.

१७. [वगळण्यात आले].

१८. नियम.

१९. मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ (१) ची सुधारणा (छापली नाही).

२०. मुख्य अधिनियमाचे नवीन कलम ६२-ब (छापले नाही.)

# सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक १५[१]

[मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२०]

[१३ डिसेंबर १९२०]

या अधिनियमात, पुढील आदेश व अधिनियमान्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९५० चा मुंबई अधिनियम ८.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५० चा मुंबई अधिनियम ४८.

**[२][बृहन्मुंबईत] प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम**

**ज्याअर्थी,** बृहन्मुंबईत प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याबाबत तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

१८८८ चा मुंबई ३.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२० असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व अन्वयार्थ लावणे.

(२) तो, फक्त [२][बृहन्मुंबईस] लागू असेल.

(३) तो, यात यापुढे " मुख्य अधिनियम " म्हणून उल्लेख केलेल्या मुंबई शहर नगरपालिका अधिनियम १८८८ याचाच भाग आहे आणि त्यास पूरक आहे असा त्याचा अर्थ लावला पाहिजे.

**२.** विषयात किंवा संदर्भात याविरुध्द काही नसल्यास, या अधिनियमात -- व्याख्या.

(१) मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेत "जाणे " या संज्ञेचा अर्थ विहित केलेल्या शैक्षणिक प्राधिकाऱ्याच्या संमतीने [३][शिक्षण समिती] फर्मावील अशा प्रत्येक दिवशी आणि अशा प्रत्येक वेळी किंवा अनेक वेळा अशा शाळेत शिक्षण घेण्यासाठी हजर राहणे असा समजावा ;

(२) "मूल" या संज्ञेचा अर्थ, ज्याचे वय सहा वर्षाहून कमी नाही आणि अकरा वर्षाहून अधिक नाही ते मूल, असा समजावा ;

(३) "आईवडील" या संज्ञेत, पालकाचा आणि मूल ज्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष अभिरक्षेत असेल त्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(४) "विहित" या संज्ञेचा अर्थ [४][[५][राज्य]शासनाने] या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले असा समजावा ;

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **मुंबई शासन राजपत्र**, १९२०, भाग पाच, पृष्ठ ३९१ पहा. प्रवर समितीच्या अहवालासाठी **मुंबई शासन राजपत्र**, १९२०, भाग पाच, पृष्ठ ७५४ (ए) पहा; आणि परिषदेतील कामकाजासाठी **मुंबई शासन राजपत्र**, १९२०, भाग पाच, पृष्ठे ६४५ आणि ९६८ पहा.

२. मूळ मजकुराऐवजी हा मजकूर सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७, कलम ९ ; आणि सन १९५० चा मुंबई अधिनियम ४८ यांद्वारे दाखल केला.

३. "शालेय समिती" या मजकुराऐवजी हा मजकूर, सन १९५० चा मुंबई अधिनियम ४८, कलम ८१ द्वारे दाखल केला.

४. "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक शासन" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक बदलासह, भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल केला.

५. "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल केला.

(५) "प्राथमिक शिक्षण" या संज्ञेचा अर्थ, त्या त्या वेळी [१][[२][राज्य]शासनाने] मान्यता दिलेली असेल असे शिक्षण असा समजावा ;

(६) "मान्यताप्राप्त प्राथमिक शाळा" या संज्ञेचा अर्थ, ज्या शाळेत (किंवा शाळेच्या विभागात) प्राथमिक शिक्षण दिले असेल आणि जिला, विहित केलेल्या शैक्षणिक प्राधिकाऱ्याने त्या त्या वेळी मान्यता दिली असेल अशी शाळा (किंवा शाळेचा विभाग) असा समजावा ;

[३][(७) "शिक्षण समिती" या संज्ञेचा अर्थ, मुख्य अधिनियमाचे कलम ५०-ह अन्वये नेमलेली समिती असा समजावा.]

*प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासाठी अधिसूचना काढणे.*

**३.** (१) महानगरपालिकेस [१][[२][राज्य]शासनाची] आगाऊ मंजुरी घेऊन, अधिसूचनेद्वारे [४][बृहन्मुंबई] किंवा तिच्या कोणत्याही प्रभागात किंवा प्रभागाच्या भागात, मुलगे किंवा मुली यांचे किंवा दोन्हींचे प्राथमिक शिक्षण, अधिसूचनेत निर्दिष्ट करावयाच्या तारखेपासून सक्तीचे होईल असे जाहीर करता येईल.

परंतु, फक्त मुलगे किंवा मुली यांच्या संबंधाने या कलमान्वये अधिसूचना काढण्यात आली असेल तेव्हा महानगरपालिकेस, तशीच मंजुरी घेऊन, फक्त मुलग्यासंबंधाने अधिसूचना काढण्यात आली असेल तर मुलींसंबंधाने, आणि फक्त मुलींसंबंधाने अधिसूचना काढण्यात आली असेल तर मुलग्यांसंबंधाने, त्यानंतर अधिसूचना काढता येईल.

(२) या कलमान्वये काढलेली अधिसूचना [५][**शासकीय राजपत्रात**] प्रसिध्द केली पाहिजे आणि ती, महानगरपालिकेच्या कार्यालयात आणि महानगरपालिकेस आवश्यक वाटतील अशा कोणत्याही दुसऱ्या जागा असल्यास, लावली पाहिजे.

*महानगरपालिकेने प्राथमिक शिक्षणाबाबत तरतूद करणे.*

**४.** महानगरपालिकेने ती, तिच्या किंवा इतर मान्यता मिळालेल्या शाळांमध्ये, मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबत योग्य तरतूद करू शकेल किंवा करील अशी [१][[२][राज्य]शासनाची] खात्री करून दिल्याशिवाय कलम ३ अन्वये अधिसूचना काढता कामा नये.

*अधिसूचना काढण्यापूर्वी ठराव पारित करणे.*

**५.** महानगरपालिकेने, याबाबत खास बोलाविलेल्या सर्वसाधारण सभेत पारित केलेल्या ठरावाअन्वये सक्तीचे शिक्षण देण्याबाबत अधिसूचना काढण्याचे ठरविलेले नसेल, आणि त्या सभेला उपस्थित असलेल्या, पालिका सदस्यांपैकी निदान दोन-तृतीयांश पालिका सदस्यांनी आणि एकूण पालिका सदस्यांपैकी निदान एक-द्वितीयांश पालिका सदस्यांनी त्या ठरावास पुष्ठी दिलेली नसेल तर, कलम ३ अन्वये अधिसूचना काढता कामा नये.

---

१. "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक शासन" हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक बदलांसह, भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल केला.

२. "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल केला.

३. खंड (७) हा सन १९५० चा मुंबई अधिनियम ४८, कलम ८१ द्वारे बदली दाखल केला.

४. मूळ मजकुराऐवजी हा मजकूर सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७, कलम ९ आणि १९५० चा मुंबई अधिनियम ८ यांद्वारे दाखल केला.

५. "मुंबई शासन राजपत्रात" या मजकुराऐवजी हा मजकूर भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल केला.

*[१][शिक्षण समितीचे] कर्तव्य.*

६. कोणत्याही प्रभागाकरिता किंवा प्रभागाच्या भागाकरिता कलम ३ अन्वये अधिसूचना काढल्यास, या अधिनियमाच्या आणि मुख्य अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, मुलांनी शाळेत जाण्यासंबंधीच्या आणि त्यांना नोकरीवर ठेवण्यासंबंधीच्या या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणणे हे [१][शिक्षण समितीचे] कर्तव्य असेल.

*मुलांनी शाळेत जावे म्हणून व्यवस्था करणे हे आई-वडिलांचे कर्तव्य असेल.*

७. कोणत्याही प्रभागात किंवा प्रभागाच्या भागात, कलम ३ खालील अधिसूचना अंमलात असेल तेव्हा, अशी अधिसूचना लागू असणाऱ्या प्रत्येक मुलाच्या आईवडिलांनी, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे वाजवी सबब नसेल तर, आणि असे आईवडिल आणि मूल अशा विभागात किंवा विभागाच्या भागात सामान्यत: राहत असतील तर, अशा मुलाने त्यातील प्राथमिक शाळेत जावे यासाठी व्यवस्था केली पाहिजे.

*वाजवी सबब या संज्ञेचा अर्थ.*

८. मुलाला मान्यताप्राप्त शाळेत जाण्यास लावण्यात कसूर केल्याबद्दल आईवडिलांस पुढीलपैकी कोणत्याही बाबतीत वाजवी सबब आहे असे समजण्यात येईल :--

(अ) जेव्हा मुलास आजारपणामुळे किंवा विकलतेमुळे किंवा इतर अपरिहार्य कारणामुळे शाळेत जाणे शक्य नसेल तेव्हा ;

(ब) जेव्हा मुलास मान्यताप्राप्त शाळेव्यतिरिक्त इतर प्रकारे शिक्षण मिळत असेल, आणि असे शिक्षण (शिक्षण समितीच्या) मते योग्य असेल किंवा अशा मुलाने त्याचे प्राथमिक शिक्षण आधीच पुरे केले असेल तेव्हा ;

(क) [१][शिक्षण समितीने] ठरविलेल्या अंतराच्या आत कोणतीही मान्यताप्राप्त शाळा नसेल तेव्हा ;

*उपस्थितीचा आदेश देणे.*

९. ज्यास कलम ७ च्या तरतुदींन्वये आपल्या मुलास मान्यताप्राप्त शाळेत जाण्यास लावणे भाग आहे अशा कोणत्याही आईवडिलांनी तसे करण्यात कसूर केली आहे अशी [१][शिक्षण समितीची] खात्री झाल्यास, [१][शिक्षण समितीस] आईवडिलांस त्यांची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आदेश देता येईल आणि अशा आदेशाद्वारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस व तारखेपासून अशा मुलास मान्यताप्राप्त शाळेत जाण्यास लावण्याविषयी अशा आईवडिलांस निदेश देता येईल.

*मुलास शाळेत जाण्यास लावण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.*

१०. (१) जेव्हा कोणाही आईवडिलांविरुध्द, कलम ९ अन्वये मुलास अनुलक्षून आदेश देण्यात आला असेल आणि अशा आईवडिलांनी अशा आदेशाच्या तारखेस किंवा तारखेनंतर अशा मुलाच्या बाबतीत कलम ७ च्या तरतुदी पाळण्यात कसूर केल्यास ते अशा आईवडिलांस, दंडाधिकाऱ्यांपुढे सिध्दापराध ठरविण्यात आले असता, पाच रुपयांपेक्षा अधिक नाही इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होतील.

(२) [१][शिक्षण समितीने] तक्रार केल्याखेरीज कोणत्याही न्यायालयाने या कलमाखालील अपराधाची दखल घेता कामा नये.

*सक्तीचे शिक्षण लागू असलेल्या मुलास कामावर लावल्याबद्दल शास्ती.*

११. (१) जो कोणी कलम ७ च्या तरतुदी ज्याच्या बाबतीत लागू आहेत अशा मुलास, त्याच्या शिक्षणात किंवा विद्याभ्यासात व्यत्यय येईल अशा रीतीने स्वत:च्या किंवा कोणत्याही व्यक्तीच्या वतीने, जाणूनबुजून आपल्या कामावर लावील, तो, दंडाधिकाऱ्यापुढे सिध्दापराध ठरविण्यात आला असता, पंचवीस रुपयांपेक्षा अधिक नाही इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

---

१. "शालेय समिती" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, सन १९५० चा मुंबई अधिनियम ४८, कलम ८२ द्वारे दाखल केला.

(२) [१][शिक्षण समितीने] तक्रार केल्याखेरीज कोणत्याही न्यायालयाने या कलमाखालील अपराधाची दखल घेता कामा नये, आणि या कलमान्वये कोणत्याही व्यक्तीविरुध्द तक्रार करण्यापूर्वी, [१][शिक्षण समितीने] अशा व्यक्तीस या कलमान्वये पूर्वी सिध्दापराध ठरविण्यात आले नसेल तर, त्यास ताकीद देवविली पाहिजे.

[१][शिक्षण समितीस] तिच्या वतीने हजर राहण्याचा प्राधिकार एखाद्या व्यक्तीस देता येणे.

**१२.** [१][शिक्षण समितीच्या] वतीने, समिती अधिकार देईल अशा व्यक्तीस कलम १० किंवा ११ अन्वयेची तक्रार दंडाधिकाऱ्याकडे करता येईल.

**१३.** [या कलमाच्या प्रयोजनाकरिता कर बसविणे.] हे कलम, सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ८३ अन्वये निरसित करण्यात आले.

फी माफ करणे.

**१४.** कोणत्याही प्रभागात किंवा प्रभागाच्या भागात कलम ३ खालील अधिसूचना अंमलात असेल तेव्हा, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या ज्या कोणत्याही मुलग्याचे किंवा मुलीचे वय अकरा वर्षांपेक्षा जास्त नसेल त्या मुलग्याच्या किंवा मुलीच्या प्राथमिक शिक्षणासंबंधी महानगरपालिकेच्या कोणत्याही शाळेत कोणतीही फी आकारता कामा नये.

विशिष्ट वर्गांना किंवा समाजांना सूट देण्याचा अधिकार.

**१५.** [२][[३][राज्य] शासनास] [४]**[शासकीय राजपत्रात]** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विशिष्ट वर्गाला किंवा समाजाला, या अधिनियमाच्या कक्षेतून वगळता येईल.

कसुरीबद्दल अधिसूचना मागे घेणे.

**१६.** [२][[३][राज्य] शासनाच्या] मते महानगरपालिकेने या अधिनियमान्वये करणे आवश्यक आहेत अशा गोष्टी करण्यात कसूर केली असेल तेव्हा, [२][[३][राज्य] शासनास], महानगरपालिकेस स्पष्टीकरण करण्याची संधी दिल्यानंतर, [४]**[शासकीय राजपत्रातील],** अधिसूचनेद्वारे, कलम ३ अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना रद्द करता येईल.

**१७.** [दंडाच्या रकमा महानगरपालिकेत जमा करणे.] हे कलम, भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश, या अन्वये वगळण्यात आले.

नियम

**१८.** (१) [२][[३][राज्य] शासनास], या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता [४]**[शासकीय राजपत्रात]** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

---

१. "शालेय समिती" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह सन १९५० चा मुंबई अधिनियम ४८, कलम ८२ द्वारे दाखल केला.

२. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक शासन" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

३. "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल केला.

४. "मुंबई शासन राजपत्रात" या मजकुराऐवजी हा मजकूर भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे दाखल केला.

(२) विशेषतः आणि मागील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता,--

(अ) कलम २, पोट-कलम (१) आणि (६) या अन्वये सोपविलेली कर्तव्ये ज्या शिक्षण प्राधिकाऱ्याने बजाविली पाहिजेत तो प्राधिकारी विहित करण्यासाठी ;

(ब) कलम ३ अन्वये अधिसूचना काढण्याकरिता मंजुरी मिळविण्याबाबत ज्या रीतीने अर्ज केला पाहिजे ती रीत विहित करण्यासाठी ;

(क) कलम ३ अन्वये मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी कोणती तरतूद योग्य समजावी ते सामान्यतः ठरविण्यासाठी ;

(ड) महानगरपालिका क्षेत्रात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणास पात्र असलेल्या मुलांची नोंदवही तयार करण्याबाबत महानगरपालिकेस फर्मावण्यासाठी ; आणि

(ई) [1][[2][राज्य] शासन], मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्याबाबतच्या खर्चाचा हिस्सा देण्याचे ठरवील तेव्हा [1][[2][राज्य] शासनाने], त्याबाबतचा खर्च कोणत्या मर्यादेपर्यंत सोसला पाहिजे ती मर्यादा विनिर्दिष्ट करण्यासाठी,

असे नियम करता येतील.

**१९-२०.** [कलमे १९ आणि २० अन्वये करण्यात आलेल्या सुधारणा, सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ मध्ये समाविष्ट केल्या आहेत.]

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी "प्रांतिक शासन" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

२. "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल केला.

एच ५०-६०८२ पु.-११-२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.